# एम्कोचा 'परिवर्तन' सोहळा




## विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सादर केला सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी | जळगाव

एम्को उद्योग समूहातर्फे परिवर्तन कार्यक्रमांतर्गत मंगळवारी वार्षिक पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैन उद्योग समूहाचे उपाध्यक्ष अशोक जैन होते तर डॉ. विवेकानंद कुलकर्णी व डॉ. प्रसन्न रेदासनी यांची प्रमुख उपस्थिती होती.

भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन मल्टिपर्पज हॉल येथे मंगळवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन व्यवस्थापकीय विश्वस्त एस.रामास्वामी यांनी केले. यावेळी एम्कोचे प्रशासकीय वरिष्ठ व्यवस्थापक विवेक बंगाली उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमात पालिकेचे चौबे विद्यालय, भोईटे विद्यालय, महाराणा प्रताप हायस्कूल आणि विवेकानंद विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. एम्कोतर्फे 'परिवर्तन' कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास' कार्यक्रम राबवला जातो. आतापर्यंत सुमारे ३५ हजार विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.